पुणे व पिंपरी चिंचवड सीसीटीव्ही प्रकल्पासाठी निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/भाग-६/पोल-३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: २६. ०८. २०१९

<u>वाचा :</u>

१) शासनाचे क्रमांक आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४,दि.१७.९.२०१३ चे इरादा पत्र (Letter of Intent)
२) गृह विभाग,शासन निर्णय क्र. आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४, दि.१४.१०.२०१३
३) महाराष्ट्र शासन आणि मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांचे दरम्यान दि.२८.१०.२०१३ रोजी झालेला करारनामा.
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७.४.२०१५
५) उच्च शक्ती प्रदान समितीची दि. १०.०५.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त
६) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२.४.२०१८
७) गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र. क्र. ६४/विशा -३(अ), दि.०४.०८.२०१७.
८) पुणे व पिंपरी चिंचवड सीसीटीव्ही प्रकल्पासाठीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि. २८.०६.२०१७ च्या बैठकीचे इतिवृत्त.
९) पोलीस आयुक्त, पुणे यांचे O. No. CP/PA/CCTV/५६/२०१८, दि.११.०५.२०१८ रोजीचे पत्र.
१०) उच्च शक्ती प्रदान समितीची दि.२६.०३.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
११) उच्च शक्ती प्रदान समितीची दि. ०८.०४.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त
१२) उच्च शक्ती प्रदान समितीची दि. १३.०६.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त
१३)) मे.प्राईसवॉटरहाऊस कूपर्स कंपनी यांचा दि.२३.०४.२०१९ व दि.०४.०५.२०१९ रोजीचा ई-मेल.
१४) संचालक, अलाईड डिजिटल यांचे दि.०२.०७.२०१९ रोजीचे पत्र व देयक
१५) संचालक, अलाईड डिजिटल यांचे दि.२५.०७.२०१९ रोजीचे पत्र व देयक
१६) संचालक, अलाईड डिजिटल यांचे दि.२६.०७.२०१९ रोजीचे पत्र व देयक
१७)मे. प्राईसवॉटरहाऊस कूपर्स कंपनी यांचा दि.०१.०८.२०१९ रोजीचा ई-मेल.

<u>प्रस्तावना :</u>

पोलीस आयुक्त, पुणे यांचे अधिनस्त पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. कंपनीला दि.१७.९.२०१३ रोजी इरादापत्र (Letter of Intent) देण्यात आले होते. संदर्भाधीन क्र. २ येथे नमुद गृह विभाग, शासन निर्णय दि.१४.१०.२०१३ अन्वये सदर प्रकल्पास व त्यासाठी येणाऱ्या संभाव्य रु. २२५ कोटी (रुपये दोनशे पंचवीस कोटी फक्त) इतक्या रक्कमेच्या खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ येथे नमुद करारनाम्यानुसार सदरहू कंपनीला देय असणारी रक्कम एकरकमी देय न करता, पुढील ६ वर्षाच्या कालावधीमध्ये (म्हणजेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर २०% आणि उर्वरित ८०% रक्कम २० समान तिमाही हप्त्यामध्ये) अदा करणे बंधनकारक आहे.

२. पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाचे काम पुर्ण झाले असुन सदर प्रकल्प दि.२७.१०.२०१५ रोजी कार्यान्वित (Go-Live) झाला आहे. मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. या कंपनीला पुणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या केलेल्या कामासाठी आजपर्यंत एकूण रु.१५८,४६,९०,०४९/- (अक्षरी रुपये एकशे अठ्ठावन्न कोटी सेहचाळीस लाख नव्वद हजार एकोणपन्नास फक्त) एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. तसेच पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे रक्कम अदा करावयाची आहे-

१. प्रकल्प Go-Live झाल्यानंतर केलेल्या कामासंबधीच्या Capex भागासाठीच्या रकमेत फरक येत असल्याने(Differential CAPEX reimbursement for work completed post GO-Live) सदरची रक्कम अदा करण्याची विनंती मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांनी संदर्भाधिन क्र.१६ नुसार विंनती केली आहे. उच्च शक्ती प्रदान समितीच्या दि.१३.०६.२०१९ रोजीच्या बैठकीत याबाबत रु.६५,७१,५१९/- एवढी रक्कम अदा करण्यास मान्यता दिली आहे.

२. पुणे पोलीस आयुक्त यांच्या विनंतीवरुन गणपती विसर्जनादरम्यान बसविण्यात आलेल्या ५३ अतिरीक्त सीसीटीव्ही कॅमे-याबाबतचे पंधराव्या तिमाहीसाठीचे मे.एडीएसल कंपनीने सादर केलेले संदर्भ क्र.१४ येथे सादर केलेले देयक व उच्च शक्ती प्रदान समितीने दि.०८.०४.२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेली मान्यता तसेच मे.पीडब्ल्यूसी यांचा दि.०१.०८.२०१९ रोजीच्या अहवालातील गणपती उत्सवादरम्यान बसविण्यात आलेल्या कॅमे-याबाबतचे अभिप्राय विचारात घेता रु.२८,९८,५७०/-(या रकमेत १२% जीएसटी कराचा समावेश आहे) एवढी रक्कम अदा करावयाची आहे.

३. Integration of Multi DVR System at Police Station& CP Office साठी ७०% रक्कम शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/भाग-३/पोल-३ दि.२६.०३.२०१८ नुसार अदा करण्यात आली आहे व उर्वरित ३० % रक्कम तीन वर्षात करावयाची आहे .सबब यासाठी सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या दोन वर्षासाठी रु.२,६२,५२८/-(या रकमेत जीएसटी कराचा समावेश नाही) एवढी रक्कम अदा करावयाची आहे.

३. सबब उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे देयकाची रक्कम मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांना अदा करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती त्यानुंषगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाबाबत मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. आणि महाराष्ट्र शासन यांचे दरम्यान दि. २८.१०.२०१३ रोजी करार झाला आहे. प्रकल्प Go-Live झाल्यानंतर केलेल्या कामासंबधीच्या Differential CAPEX reimbursement for work completed post GO-Live साठीच्या देयकाची रक्कम , गणपती विसर्जनादरम्यान बसविण्यात

आलेल्या ५३ अतिरीक्त सीसीटीव्ही कॅमे-याबाबतचे पंधराव्या तिमाहीसाठीच्या देयकाची रक्कम व Integration of Multi DVR System at Police Station& CP Office साठी सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या दोन वर्षासाठीच्या देयकाची रक्कम अशा तीन बाबीसाठी खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे एकुण रु. ९७,३२,६१७/-(सत्त्यान्नव लाख बत्तीस हजार सहाशे सतरा फक्त) रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

Sr	**Deliverable**	Amount (in INR)
1.	Differential CAPEX reimbursement for work completed post GO-Live	65,71,519/-
2.	Payment for Ganpati Locations (Payment for quarter 15)	28,98,570/-
3.	Integration of Multi DVR System at Police Station& CP Office(Payment for 1st and 2nd year Installment)	2,62,528/-
	Total	97,32,617/-

२. सदरहू रक्कम आहरीत करण्यासाठी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना नियंत्रक अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यास येत आहे. त्यांनी रु. ९७,३२,६१७/- (सत्त्यान्नव लाख बत्तीस हजार सहाशे सतरा फक्त) एवढया रकमेचा धनादेश अलाईड डिजीटल सर्विसेस लि. कंपनीच्या कोटक महिंद्रा बँक, नरीमन पॉईन्ट शाखा, मुंबई यांचेकडील **ESCROW Account No.02312436713, IFSC: KKBK0000958** या खात्यावर जमा करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा "मागणी क्र. बी-१०, ४०५५- पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००)(०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) योजनेतर योजना -५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२.४.२०१८ ला अनुसरुन प्रशासकीय विभागाला असलेलया अधिकारान्वये तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र. क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अनु.क्र. २७ अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर देयक पुणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या करारनाम्यात नमूद केल्यानुसार यासाठी लागू असलेल्या सर्व प्रचलीत कर व इतर वजाती वसूल करुन अदा करण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२६१४४३५०२५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, street=MAIN BUILDING, 2ND FLOOR,MANTRALAY,MUMBAI, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2019.08.26 14:55:11 +05'30'

(कैलास गायकवाड)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव
४. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे
९. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, पुणे
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
११. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे
१२.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१४.मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि., प्रिमाईसेस नं. १३-ए, १३ वा मजला, अर्नेस्ट हाऊस, बॅकबे रेक्लेमेशन, एनसीपीए रोड, ब्लॉक III, नरीमन पाईंट, मुंबई-२१.
१५.वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
१६.अवर सचिव, अर्थ-१,गृह विभाग.
१७.निवडनस्ती, पोल-३.

*****